# ः हले हा नंदाघरी पाळणा ः

हले हा नंदाघरी पाळणा ।
त्यांत देखणा गोजिरवाणा हसतो गोकुळराणा ।। धृ ।।

ओठ लाल हे डोळे चिमणे । हास्यातून त्या फुले चांदणें ।
स्वरूप सुंदर लोभसवाणे मोहून घेई मना ।। 1 ।।

बोले बोबडे ते भाग्याचे । शब्द वांटतीं ते वेदाचे ।
रूणझुणताती घुंगरवाळे ये धेनूना पान्हा ।। 2 ।।

नंदा यशोदा करती कौतुक । आनंदाचे अमाप तें सुख ।
मायपित्याविण कसे कळावे सौख्य तयाचे कुणा ।। 3 ।।